# प्रेसनोट

दि. १८/०२/२०२४

## गुन्हा दाखल न करण्यासाठी मध्यस्थी करणा-या खाजगी इसमावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | कोरेगांवपार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २५/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | ओंकार भरत जाधव, वय ३२ वर्ष, व्यवसाय – चालक, रा. फ्लॅट नं. ११०५, वस्तुविवा सोसायटी, वाकड पुणे. मुळ रा. अकोले, तालुका, अकोले, जिल्हा - अहमदनगर. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५,००,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,००,०००/- रुपये (एक लाख रुपये) |
| पडताळणी दिनांक | १५/०२/२०२४, १६/०२/२०२४ व दि. १७/०२/२०२४ |
| सापळा दिनांक | १७/०२/२०२४ |

ठिकाण :- जहाँगिर हॉस्पीटलचे पार्किंगमध्ये, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचेविरुद्ध सहायक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग, पिंपरी-चिंचवड, पुणे यांचेकडे कात्रज-कोंढवा बायपास रोड येथील जागेसंबंधात फसवणुकीचा तक्रार अर्ज केला होता. सदर तक्रारी अर्जाची चौकशी सहायक पोलीस आयुक्त मुगुटलाल पाटील, देहुरोड यांचेकडे सुरु होती. सदर तक्रारी अर्जामध्ये तक्रारदार यांचे विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व मदत करण्यासाठी ५,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी लोकसेवक मुगुटलाल पाटील यांचे सुचनेवरून खाजगी इसम ओंकार जाधव याने केलेबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक स.पो.आ. मुगुटलाल पाटील यांच्याकरीता खाजगी इसम ओंकार जाधव याने रु. ५,००,०००/- ची लाच मागणी करुन, दि. १७/०२/२०२४ रोजी लाचेचा पहिला हफ्ता म्हणुन रु. १,००,०००/- रुपये पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारली असता, खाजगी इसम ओंकार जाधव यास ताब्यात घेण्यात आले असून, कोरेगांवपार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक नितिन जाधव तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**




(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.